MHYA130012462025

## निशाणी क्र. १४ खालील आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज अर्जदार हिने गैरअर्जदाराच्या वेतनातून दरमहा खावटी वसुली रक्कम रुपये १५,०००/- दरमहा कपात करुन मिळणे बाबत दाखल केलेला आहे.

२. सदरील अर्जास गैरअर्जदार यांनी आक्षेप नोंदविला आहे की, गैरअर्जदार हा प्रस्तुत प्रकरणा व्यतिरिक्त कि. फौ. ख. क्र. २४/२०२५ 'विद्या -वि- प्रदीप' या खावटीच्या केसमध्ये नियमित खावटीच्या रक्कमेचा भरणा करीत आहे. तसेच योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती गैरअर्जदार यांनी केली आहे.

३. प्रस्तूतचा अर्ज व मुळ अभिलेखाचे अवलोकन केले. तसेच अर्जदाराच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वि. न्यायालयाने गैरअर्जदार यांच्या विरुध्द खावटीच्या केसमध्ये ८,०००/- रु. खावटी अर्जदार यांना देण्याचा आदेश पारीत केला आहे. गैरअर्जदार हा जाणुन-बुजून खावटीचे पैसे भरण्यास दुर्लक्ष करुन खावटीची रक्कम भरण्यास टाळाटाळ करीत आहे. तसेच अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे आज रोजी गैरअर्जदाराकडे तिची एकूण रक्कम १,३३,०००/- रुपये थकित खावटी वसूल करणे बाकी आहे. तसेच त्याबाबतचे प्रथमदर्शी दस्त ऐवज अभिलेखावर उपलब्ध आहे. त्यामुळे आज रोजी अर्जदारांची गैरअर्जदारांकडे दि. ०८/०५/२०२४ ते दि. ०८/०९/२०२५ या कालावधीची रक्कम १,२८,०००/- रुपये व अर्जाचा खर्च ५,०००/- रुपये अशी एकुण १,३३,०००/- रुपये थकीत खावटी वसूली करणे बाकी असल्याचे स्पष्ट होते. म्हणजेचं सदर गैरअर्जदाराने फौ. कि. अ. क्र. ८४/२०२४ मधील आदेशाची पुर्तता केलेली नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदार हे थकित खावटी गैरअर्जदाराकडून वसुल करण्यास हक्कदार आहे.

४. प्रस्तूत अर्जाच्या अनुषंगाने वेतन कपातीचा विचार केला असता, गैरअर्जदार हा अरुणोदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लाख (रायजी), ता. दिग्रस येथे शिपाई

या पदावर कार्यरत असल्याबाबत, प्रथमदर्शी पुरावा अभिलेखावर आहे. तसेच नि. क्र. १९ वरील गैरअर्जदाराच्या माहे-ऑक्टोबर २०२५ ते माहे-डिसेंबर २०२५ च्या वेतन प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, त्यास दरमहा २७,९२७/- निव्वळ वेतन मिळत असल्याचे प्रथमदर्शी दिसुन येते. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदाराची थकित खावटी रक्कम भरण्यास आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्याचे दिसुन येते. तरी देखील गैरअर्जदाराने उपरोक्त नमुद फौ. कि. अ. क्र. ८४/२०२४ मधील आदेशाची पुर्तता अंमलबजावणी केलेली नाही. त्यामुळे गैरअर्जदाराच्या वेतातून दरमहा खावटी वसूल करणे आवश्यक आहे. त्यामुळे खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेः-

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अरुणोदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लाख (रायजी), ता. दिग्रस जि. यवतमाळ यांना आदेशित करण्यात येते कि, त्यांनी गैरअर्जदार शिपाई नामे- प्रदीप बद्री राठोड यांच्याकडे उपरोक्त नमूद कालावधीतील थकित असलेल्या एकूण १,३३,०००/- रुपये खावटी रक्कम वसुली पर्यंत त्याच्या दरमहा वेतनातून १०,०००/- रुपये प्रमाणे रक्कम कपात करुन, सदर कपात केलेली रक्कम या न्यायालयातील फौ. कि. अ. क्र. १२५/२०२५ या प्रकरणात जमा करावी.

३. सदरील आदेशाच्या पुर्ततेकामी संबंधीत विभागास पत्र व्यवहार करावा.

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2026.03.02 17:02:00 +0530

दिनांक. ०२/०३/२०२६

( बी. एन. गोडबोले)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायलय क्र. १ दिग्रस